## कोणत्या कार्यासाठी कोणती वस्त्रे वापरावीत

शान्तौ श्वेतं जये श्यामं भद्रेरक्तं भये हरितं ।
पीतं धनादिसंलाभे पंचवर्ण तु सिद्धये ।। १३८ ।।

अर्थ - शांततेसाठी शुभ्र, विजय मिळविण्यासाठी काळे, कल्याणासाठी लाल, भीती घालविण्यासाठी हिरवे, धन आदीच्या लाभासाठी पिवळे वस्त्र आणि सिद्धीप्राप्तीसाठी पंचवर्णीय वस्त्र वापरावे व त्याच प्रकारची फुले पूजेसाठी वापरावी. ।। १३८ ।।

## फाटलेले वस्त्र नेसू नये

खंडिते गलिते छिन्ने मलिने चैव वाससि ।
दानं पूजा तपो होमः स्वाध्यायो विफलं भवेत् ।। १३९ ।।

अर्थ - खंडित-फाटलेले, गलित-जीर्ण, छिन्न म्हणजे अतिशय जीर्ण झालेले व मळके वस्त्र धारण करुन दान दिले, पूजा केली, तप केले, होम केला किंवा स्वाध्याय केला तर तो व्यर्थ होतो ।। १३९ ।।

भावार्थ - भगवंताशी संबंधित कोणत्याही गोष्टीसाठी शुचिता, स्वच्छता आणि पवित्रता आवश्यक आहे. पूजेच्यावेळी स्वच्छ वस्त्र पाहिजे. फाटके, जीर्ण, मळके वस्त्र घालून दान, पूजा, तप, होम, स्वाध्याय आदि क्रिया केल्या तर निष्फळ होतात. वस्त्र स्वच्छ तर मन स्वच्छ. म्हणून या सर्व क्रियांसाठी स्वच्छ वस्त्र आवश्यक आहे.

## पाप लागेल म्हणून फुलांचा त्याग करु नये

माल्यगंधप्रधूपाद्यैः सचितैः कोर्चयेज्जिनम् ।

सावद्यसंभवं वक्ति य: स: एव प्रबोध्यते ॥ १४० ॥
जिनार्चा नेकजन्मोत्थं किल्विषं हन्ति यतकृतम् ।
सा किंन यजनाचारसंभवं सावद्यमंगिनाम् ॥ १४१ ॥

अर्थ - माला, गंध, धूप आदी सचित पदार्थांनी कोणता बुद्धिमान मनुष्य भगवंताची पूजा करील ? सचित वस्तूंनी पूजा केल्यावर पाप घडण्याची संभावना आहे असे म्हणणारांना आचार्यांनी उत्तर दिले आहे. ज्या जिनेंद्राच्या पूजनामुळे अनेक जन्मात घडलेल्या पापांचे क्षालन होते, तो जिनेश पूजाविधीमुळे घडलेल्या पापांचा नाश करणार नाही का ? निश्चितच करील. ॥ १४०-१४१ ॥

पूजा करताना शक्यतो हिंसेचे पाप लागणार नाही, याकडे लक्ष द्यावे. पापक्रियांना सावद्य-क्रिया म्हणतात.

## पूजेच्या दोषांचा परिहार

प्रेर्यन्ते यत्र वातेन दन्तित: पर्वतोपमा: ।
तत्राल्पशक्तितेजस्सु का कथा मशकादिंषु ॥ १४२ ॥

अर्थ - ज्या वाऱ्याने पर्वतासारखे हत्ती उडविले जातात, तेथे अल्पशक्ती व अल्पतेजस्वी अशा मच्छराचा काय पाड ! ॥ १४२ ॥

भावार्थ - मागील श्लोकाच्या स्पष्टीकरणासाठी हा श्लोक आहे. पूजाविधिसाठी घडणारे लहानसे पापही जिनेंद्रच नष्ट करतील, हे सांगताना त्यांनी वाऱ्याचे उदाहरण दिले आहे. वाऱ्याचे प्रचंड वेगाने पर्वतासारखे हत्तीही उडून जातात. तेथे लहानशा चिलटाची काय कथा ! जिनेंद्रभक्तीचे महात्म्यच एवढे मोठे आहे की त्यामुळे पापाचे पर्वतही नाहीसे होतात. तेथे पूजाविधीसाठी केलेले पाप कसे राहू शकेल ?

## दोषांच्या नाशासाठी उदाहरण

भुक्तं स्यात्प्राणनाशाय विषं केवलमङिनाम् ।
जीवनाय मरिचादिसदौषधिविमिश्रितः ॥ १४३ ॥

अर्थ - फक्त विषाचे सेवन केले तर ते प्राणनाशाला कारणीभूत होते. पण तेच विष काळीमिरी इ.उत्तम औषधीसहित दिले तर ते प्राणाचे रक्षण करते. ॥ १४४ ॥

भावार्थ - कोणतीही गोष्ट पूर्णपणे निरुपयोगी अर्थात सदोष नसते. योग्य वस्तूच्या सान्निध्यात ती अत्यंत उपयोगी ठरू शकते, हे सिद्ध करण्यासाठी ग्रंथकाराने विषाचे उदाहरण दिले आहे. नुसते विष प्राणहारक आहे. पण योग्य वस्तूच्या अनुपानासहित (मिरे इ. वस्तू बरोबर दिले तर त्याने प्राण वाचतात. वस्तूचा उपयोग कसा केला जातो, याला महत्व आहे.

## पूजा करण्यात अल्पहिंसा

तथा कुटुम्बभोगार्थमारम्भः पापकृद् भवेत् ।
धर्मकृद्दानपूजादौ हिंसालेशो मतः सदा ॥ १४४ ॥

अर्थ - तसेच जी (कार्ये) कुटुंबांच्या सुखासाठी व उपभोगासाठी केली जातात ती क्रिया पाप उत्पन्न करणारी आहे. पण तीच क्रिया दान-पूजा इ. साठी असेल तर ती धर्मवर्धक आहे. परंतु त्यात लेशमात्र हिंसा आहे. ॥ १४४ ॥

## गंधोदक व आर्शिका

गंन्धोदकंच शुद्धयर्थ शेषां संतति वृद्धये ।

तिलकार्थं च सौगंध्यं गृण्हन् स्यात् नहि दोषभाक्।। १४५ ।।

अर्थ - (निर्माल्य ग्रहण करणे निषिद्ध मानले असले तरी ) गंधोदक धारण करणे हे शुद्धतेकरिता, आशिका धारण करणे हे सन्ततीच्या वृद्धीसाठी आवश्यक आहे. तसेच तिलक लावण्यासाठी सुगंधित चंदन-केशरादी धारण करणारा पुरुष दोषास पात्र नाही. ।। १४५ ।।

भावार्थ - जैन धर्मात निर्माल्य म्हणजे देवाला चढवलेली वस्तू वापरणे हे निषिद्ध मानले जाते. पण गंधोदक धारण करणे हे शुद्धिसाठी आवश्यक आहे. त्याने शरीर व मन पवित्र होते. तसेच आशिका म्हणजे आरती ग्रहण करणे म्हणजेही पावित्र्याचे लक्षण आहे. जिनेंद्र देवांची आरती घेतली की अनेक जन्माची पापे नाहीशी होतात. म्हणून ही दोन्ही निर्माल्य असली तरी पवित्रच आहेत.

## पूजेने पुण्य लाभ

पूज्यो जिनपतिः पूजा पुण्यहेतुर्जिनार्चना ।

फलं स्वाभुदया मुक्तिर्भव्यात्मा पूजकः स्मृतः ।। १४६ ।।

अर्थ - जिनेंद्र देव पूज्य आहेत. जिनाची अर्चना म्हणजे पूजा पुण्यास कारण आहे. स्वतःचा अभ्युदय आणि मुक्तीची प्राप्ती हे पूजेचे फळ आहे आणि पूजा करणारा भव्यात्मा हा पूजक आहे. ।। १४६ ।।

भावार्थ - पूजेसंबंधीच्या चार गोष्टी जाणून ध्यावा. पूज्य, पूरक, पूजा आणि पूजेचे फळ ह्या त्या गोष्टी. जिनेंद्रदेव तर पूजनीय आहेतच. त्यांच्या पूजेमुळेच मोक्ष मिळू शकतो आणि उद्धार करणारेही तेच आहेत. म्हणून पूजकाने, मानवाने, त्यांचीच पूजा-अर्चना केली पाहिजे.

## पूजा विधी

आवाहनं च प्रथमं ततः संस्थापनं परम् ।
सन्निधिकरणं कृत्वा पूजनं तदनन्तरम् ॥ १४७ ॥

अर्थ - पूजेच्या आधी पूज्य पुरुषाला (जिनप्रतिमेला) आवाहन केले पाहिजे. त्यानंतर स्थापना करावी. त्यानंतर सन्निधिकरण (जवळ स्थापना करुन) मग पूजा करावी. ॥ १४७ ॥

भावार्थ - पूजेआधी पूज्य व्यक्तीा आवाहन केले पाहिजे. म्हणजे ज्याची आपण पूजा करतो त्या जिनेंद्रभगवंताला प्रथम बोलावले पाहिजे. नंतर त्याची योग्य स्थानी स्थापना करुन आपल्या जवळ येण्याची (सन्निधिकरण) विनंती केली पाहिजे. म्हणजेच ती व्यक्ती पूजनीय ठरते. आवाहन, स्थापना, सन्निधीकरण, मग पूजन असा क्रम आहे. (अत्र अवतर अवतर, अत्र तिष्ठ तिष्ठ, अत्र ठः ठः, अत्र मम संन्निहितो भवभव-असा मंत्र)

### विसर्जन आणि क्षमापना

ततो विसर्जनं कार्य ततः क्षमापणा मता ।
पंचोपचारापचितिः कर्तव्या हीतिसज्जनैः ॥ १४८ ॥

अर्थ - त्यानंतर (पूजेनंतर) विसर्जन करणे आवश्यक आहे. तसेच क्षमापणा करणेही आवश्यक आहे. सज्जनांची पाच उपचारांनीच नेहमी पूजा केली पाहिजे. ॥ १४८ ॥

भावार्थ - प्रथम आवाहन, स्थापना, सन्निधिकरण करुन विधिवत पूजा केल्यावर भगवंतांचे विधिवत् विसर्जनही केले पाहिजे. आम्ही तुमची यथाभक्ती, यथाशक्ती पूजा केली आहे, आता तुम्ही आप-आपल्या स्थानी परत जा अशी विनंती करुन त्या प्रतिमेचे विसर्जन केले म्हणजे पूजेची समाप्ती होते. त्याशिवाय पूजा अपूर्णच राहते आणि शेवटी क्षमापनाही केली पाहिजे. आवाहन, स्थापना, सन्निधिकरण, विसर्जन आणि क्षमापना हे पूजेचे पाच प्रकार आहेत.

### पूजेस योग्य स्त्री

पूर्वस्नाता नुलिप्ता पि धौतवस्त्रान्विता परम् ।
षोडषाभरणोपेता स्यादवधू: पूजयेज्जिनम् ।। १४९ ।।

अर्थ - जर स्त्री पूजा करीत असेल तर तिनेही स्नान करुन, धुतलेले वस्त्र धारण करावे, सोळा अलंकार धारण करावेत आणि नंतर जिनेंद्राचे पूजन करावे, ।। १४९ ।।

भावार्थ - पुरुषाप्रमाणे स्त्रियाही जिनेंद्र भगवंताची पूजा करु शकतात. पण त्यासाठी काही गोष्टींचे पालन केले पाहिजे. त्यात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे शुचिता. स्नान करुन धुतलेले वस्त्र धारण केले पाहिजे. आणि सोळा प्रकारचे अलंकार घालून पूजेला बसावे. अपवित्र, गलिच्छ, अशुची असेल तर स्त्रियांनी पूजा करु नये.

## पूजा करणारी स्त्री कशी असावी ?

सती शीलव्रतोपेता विनयादिसमन्विता ।
एकाग्रचित्ता प्रयजेज्जिनान् सम्यक्त्वमंडिता ।। १५० ।।

अर्थ - पूजन करणारी स्त्री शीलवती, विनय इ. गुणांनी संपन्न, एकाग्रचित्त आणि सम्यक्त्व गुणाने अलंकृत असेल तर ती पूजा करण्यास योग्य आहे. ।। १५० ।।

भावार्थ - जिनेंद्र देवाची पूजा करणाऱ्या स्त्रियांची अंगी काही गुण असणे आवश्यक आहे. ती शीलवती-उत्तम चारित्र्य असलेली, विनयवती-नम्र, एकाग्रचित्त असलेली आणि सम्यक्त्वाचे आठ गुण धारण करणारी असावी. शरीर, मन यांची शुद्धता आवश्यक आहे.

## स्पृश्य शुद्रांच्या जाती

तक्षा स्त्रष्टा दिवाकीर्ति: चित्रकारोऽश्मभेदक: ।
सूत्रधार: प्रेषकाच सूत्रधारस्तु माल्यवान् ।। १५१ ।।

भरतो दीर्घजीवीं च मार्दडिकमृणालकौ ।
वृत्तीजीवी ग्रन्थिकार: कर्णजाहो नियंत्रिक: ।। १५२ ।।

धर्माध्यक्षास्तु शूद्राश्च स्पृश्याअष्टादश सम्मिता:।
कार्वकारुप्रभेदेन द्विधा तेषां  अवस्थित: ।। १५३ ।।

अर्थ - स्पृश्य शूद्रामध्ये कोणकोणत्या जातीची गणना होते, हे यात सांगितले आहे. लोहार, कारागीर, न्हावी, चित्रकार, पाथरवट, सूत्रधार, शिल्पकार, पेशकार, शिंपी, माळी, भरत (भाट, चारण इ.) दीर्घजीवी, मृदंगवादक, सारंगीवादक, आजीवक, सेवक, ग्रंथिकार (सुतार), कर्णजाह, नियंत्रिक (सारथी), आणि प्रतिहार अशा या अठरा जाती आहेत. कारु आणि अकारु भेदाने या शूद्रांची अवस्था दोन प्रकारची आहे.

आचार्यांच्या काळातील स्पृश्य-शूद्रांचा विचार यात सांगितला आहे. ते सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.

शेषा: शूद्रास्तुवर्ज्या: स्यु: जिनमंदिरकर्मसु ।
स्वकीयगृहसत्कार्ये तदधीना गृहस्थिति: ।। १५४ ।।

अर्थ - जिनमंदिर तयार करण्याच्या कामी इतर अस्पृश्य शूद्र वर्ज्य आहेत. आपल्या घरच्या सत्कार्यात वर सांगितलेल्या लोकांकडूनच कामे करवून घ्यावीत.

भावार्थ - वर दिलेल्या स्पृश्य शूद्रांच्या जाती वगळता इतर अस्पृश्य जातीच्या शुद्राकडून काम करुन घेणे अनुचित आहे. जिनमंदिर बांधण्याच्या कामीसुद्धा स्पृश्य शूद्रांनीच मदत घ्यावी. घरात जर काही शुभ कार्य करायचे असेल तर वरील जातींचे सहकार्य घ्यावे.

## द्रव्यशुद्धी-पात्रशुद्धी

एवं सम्यग्विचार्यार्थ द्रव्यपात्रादिशुद्धिभाक्।

स्व: शुद्धोऽन्यानि संशोध्य सम्यक्कृत्वा विशोधयेत् ॥ १५५ ॥

अर्थ - अशा प्रकारे सारासार विचार करुन जिन मंदिराच्या निर्माणकार्यात द्रव्यशुद्धी, पात्रशुद्धी धारण करणाऱ्या श्रावकाने स्वत: शुद्ध होऊन इतरांचेही योग्य प्रकारे संशोधन करुन पूजनसामग्री शुद्ध करुन घ्यावी. ॥ १५५ ॥

भावार्थ - पूजेच्याकामी व्यक्तीची शुद्धता आणि साधनशुचिता महत्वाची आहे. सारासार विवेक बुद्धीने निर्णय करुन द्रव्यशुद्धी म्हणजे वस्तूची शुद्धी करावी. सर्व पदार्थ शुद्ध करुन घ्यावेत. तसेच मदतीला असलेल्या व्यक्तींनाही शुद्ध करुन घ्यावे. त्यांच्या स्वच्छतेची व शुचितेची काळजी घ्यावी.

## पूजेचे फळ

शुद्धियुक्तो जिनान् भावात् पूजयेद्य: समाहित:

इप्सितार्थस्य संसिद्धिं लभते सो पि मानव: ॥ १५६ ॥

अर्थ - शुद्ध होऊन समाधानपूर्वक जो मनुष्य भावपूर्ण होऊन जिनेद्राचे पूजन करील, त्याला मनोवांछित सिद्धी प्राप्त होईल. ॥ १५७ ॥

भावार्थ - नुसती शरीराचीच नव्हे तर मनाची शुचितादेखील महत्वाची आहे. शरीर शुद्ध करुन व मनात भक्तीभाव धारण करुन जिनेंद्र भगवंताचे पूजन करावे म्हणजे 'भाव तेथे देव' या न्यायाने मनोवांछित सिद्धी प्राप्त होते. सर्व इच्छा पूर्ण होतात.

## पूजा करणारा देवेंद्र होतो

त्रिसंध्यं प्रार्चयेद्यस्तु जिनादीन् जितमत्सर: ।

सौधर्मादिषु कल्पेषु जायते सुरनायक: || १५७ ||

अर्थ - जो मत्सरभाव सोडून तीन वेळा जिनादिदेवांची पूजा करतो तो सौधर्म इ. कल्पामध्ये उत्पन्न होऊन देवांचा नायक, इंद्र बनतो. || १५७ ||

भावार्थ - पूजा करीत असताना मनात कोणाविषयी इर्षा, मत्सर आदि भावना नसाव्यात. भगवंताची पूजा सकाळी, मध्यान्ही आणि सायंकाळी (त्रिसंध्य) करावी. त्यामुळे सौधर्म कल्पामध्ये जन्म होऊन इंद्रपद प्राप्त होते.

## एकदा केलेली पूजा उत्तम फळ देते

एकवारं सुभावैर्य: पूजयति जिनाकृतिम् ।
स: सुरत्वं समाप्नोति हत्वा दुष्कृतसंततिम् || १५८ ||

अर्थ - जो मनुष्य एकदा जरी चांगल्या भावाने जिनबिंबाची पूजा करतो, तो पापरुपी संततीचा नाश करुन देवत्व प्राप्त करतो. || १५८ ||

## देवत्व प्राप्तीला पूजा कारण

प्रतिमां पूजयेत् भक्त्या जिनेंद्रस्य जितैनस: |
य: स: संपूज्यते देवैर्मृतोऽपि मनुजोत्तम: || १५९ ||

अर्थ --- जो मनुष्य पापांना जिंकणाऱ्या जिनेंद्राचे पूजन करतो, तो उत्तम पुरुष मरून स्वर्गलोकांत देवाकडून पूजिला जातो. || १५९ ||

भावार्थ --- जिनेंद्र देव स्वत: जिन म्हणजे पापाला जिंकणारे आहेत. त्यांची भक्तिपूर्वक पूजा करणाऱ्या मनुष्याला मेल्यानंतर स्वर्ग प्राप्त होतो. आणि तो देवांनाही पूज्य असतो. दुर्मिळ स्वर्गाच्या प्राप्तीसाठी निर्मळ भावनेने केलेली पूजाच कारणीभूत ठरते.

## अष्टद्रव्ययुक्त पूजा

सा पूजाऽष्टविधा ज्ञेया गृहिणीगृहमेधिनाम् |
जलादिफलपर्यन्ता भवान्तकरणक्षमा || १६० ||

अर्थ ---- ही पूजा जलापासून फलापर्यंत आठ प्रकारे करावी. ही पूजा गृहिणी ( स्त्री ) आणि पुरुष यांच्या संसाराचा नाश करण्यास समर्थ आहे. || १६० ||

## पंचामृताभिषेक

जिनेंद्र प्रतिमा भव्य: स्नपयेत् पंचकामृतै: |
तस्य नस्यति सन्ताप: शरीरादिसमुद्भव: || १६१ ||

अर्थ ---- जो भव्य पुरुष जिनप्रतिमेचा पंचामृताने अभिषेक करील त्याचे शरीरापासून उत्पन्न होणारे रोग नाहीसे होतील. || १६१ ||

भावार्थ ---- भगवंताचा पंचामृताने करावा. जल, दूध, तूप, दही, सर्वांषधी यांनी अभिषेक करावा. त्यामुळे शारीरिक व्याधी नाहीशा होतात. मनुष्य देह हा अनेक रोगांनी भरलेला आहे,

त्यामुळे अनेक शारीरिक व्याधींनी तो ग्रासला जातो. पंचामृताभिषेकाने त्या व्याधी ( रोग ) नाहीशा होतात.

पंचामृताच्या अभिषेकाचा निषेंध करणारा एक विचार पूर्वी तेरापंथ व आजही काही श्रावक हिंसेच्या भीतीने दर्शवितात. पण जैन श्राककांनी पंचामृत-अभिषेक अवश्य करावा. त्यातून होणारी द्रव्यहिंसा ही अगदी अल्प आहे. भाव जिनेंद्रच्या अभिषेकांचे, त्यांच्या परमपावन सातिशय देहाच्या अभिषेकाचे आहेत. इतकेच नव्हे तर अत्यंत पुण्यकारक, शुभ व शुध्द भावनेने केला जाणारा पंचामृताभिषेक अनंत कर्मक्षयाला कारणीभूत होतो. या विधानाचे अनेक उत्तुंग, मनस्वी साधूजनांनी समर्थन केले आहे. त्यामुळे अभिषेकाची क्रिया ही सदैव पुण्योत्पादक व संसारिक पापापासून मुक्त करणारी आहे, याबद्दल श्रावकांनी शंका बाळगण्याचे मुळीच कारण नाही.

### जलाभिषेक

श्रीमतां श्रीजिनेंद्राणां प्रतिमाग्रे च पुण्यवान् |
ददाति जलधारां यस्तिस्त्रो भृंगारनालतः || १६२ ||

जन्ममृत्युजरादु:खं क्रमात्तस्य क्षयं व्रजेत् |
स्वल्पैरेव भवैः पापरजः शाम्यति निश्चितम् || १६३ ||

अर्थ ---- जो पुण्यवान श्रावक श्रीमन्त श्री जिन प्रतिमेसमोर भृंगारनलिकेतून ( जल पात्रातून ) तीन धारा सोडतो, त्याचे जन्म - जरा - मरणाचे दु:ख क्रमशः दूर होते आणि थोड्याच भवात त्याची पापरूपी रज निश्चितपणे शांत होते. || १६२-१६३ ||

### चंदन - लेप

चंदनादयर्चना पुष्यात्सुगंधितनुभाग् भवेत् |
सुगंधीकृतदिग्भागो जायते च भवे भवे || १६४ ||

अर्थ ---- सुगंधित चंदनाने पूजा केली असता त्या पुण्यामुळे मनुष्य सुगंधित शरीर धारण करतो. आणि जन्मजन्मांतरी आपल्या कीर्तीरूपी सौरभाने दाही दिशांना सुगंधित करतो. || १६४ ||

## अक्षतार्पण

अखंडतन्दुलैः सुगंधैः शुभशालिजैः |
पूजयेज्जिन पादाब्जानक्षयां लभते रमाम् || १६५ ||

अर्थ ---- उत्तम साळीपासून तयार झालेल्या सुगंधित, उज्वल आणि अखंड तांदूळाने जो जिनेंद्र भगवंताच्या चरणकमलांची पूजा करील, त्याला अक्षय लक्ष्मीची प्राप्ती होते. || १६५ ||

## पुष्पार्चन

पुष्पैः संपूजयन् भव्योऽमरस्त्रीलोचनैः सदा |
पूज्यतेऽमरलोकेस देवीनिकरमध्यगः || १६६ ||

अर्थ ---- पुष्पांनी जिनेंद्राचे पूजन करणारा भव्य पुरुष देवलोकात देवांगनाच्या डोळ्यांनी सदा पूजिला जातो. || १६६ ||

## नैवेद्यार्पण

पक्कान्नादिसुनैवेद्यैः प्रार्चयत्यनिशं जिनान् |

स भुनक्ति महासौख्यं पंचेद्रियसमुद्भवम् || १६७ ||

अर्थ ---- जो चांगल्या प्रकारच्या नैवेद्याने भगवंतांची नेहमी पूजा करतो, तो पंचेंद्रियांनी उपभोगता येणाऱ्या सर्व सुखांचा उपभोग घेतो. || १६७ ||

## दीपार्चन

रत्नचंचलकर्पूरभवैर्दीपजिनेशिनाम् |

द्योतयेद्यः पुमानङ्घ्रौ स स्यात् कान्तिकलानिधिः || १६८ ||

अर्थ ---- जो पुरुष रत्न आणि चंचल अशा कापराच्या दीपाने जिनेंद्रदेवांच्या चरणाला प्रकाशित करतो तो तेजःपुंज आणि कलागुणांनी युक्त होतो. || १६८ ||

## धूपार्चनम्

कृष्णागुर्वादिजैधूपैर्धूपयेत् जिनपदयुगम् |

सः सर्वजनतानेत्रवल्लभः संप्रजायते || १६९ ||

अर्थ ---- जो उदबत्ती (कृष्णागरू) ने निर्माण होणाऱ्या धूपाने जिनेंद्रभगवंताच्या चरणयुगुलाला सुगंधित करतो, तो सर्व लोकांच्या नयनांना प्रिय होतो ( आवडता होतो. )

## उत्तम फळांनी पूजन

आम्रनारिंगजंबीरकवल्यादित्तरुद्भवै : |

फलैर्यजति सर्वज्ञं लभतेऽपीहितं फलम् || १७० ||

अर्थ ---- जो भव्य पुरुष आंबा, नारिंग, लिंबू, केळे इ. वृक्षापासून उत्पन्न झालेल्या फळांनी सर्वज्ञदेवांची पूजा करतो, त्याला इच्छित फळ मिळते. || १७० ||

## अष्टद्रव्याने पूजा

जलगंधाक्षतातीवसुगंधिकुसुमैः कृती |

पुष्पांजलिं ददन् दिव्यां जिनाग्रे लभते सुखम् || १७१ ||

अर्थ ---- जल, गंध, अक्षता आणि अतीव सुगंधी फुलांनी जो पुरुष जिनप्रतिमेसमोर पुष्पांजली अर्पण करतो, त्याला उत्तम सुख प्राप्त होते. || १७१ ||

## पुष्पांजली

पुष्पांजलिप्रदानेन महापुण्यं प्रजायते |

तेन स्वकीयदुःखेभ्यः नरो दत्ते जलांजलिम् || १७२ ||

अर्थ ---- पुष्पांजली अर्पण केल्याने मोठे पुण्य उत्पन्न होते. त्यामुळे स्वतःच्या सर्व दुःखाना मनुष्य नष्ट करतो. || १७२ ||

## नाम - स्थापना - द्रव्य व भाव

नामत : स्थापनातश्च द्रव्यतो भावतोऽपि तम् |

विन्यस्य पुण्यसंप्राप्त्यै पूजनयन्तु जिनेlवरम् || १७३ ||

अर्थ ---- गृहस्थाने पुण्यप्राप्तीसाठी नाम, स्थापना, द्रव्य आणि भाव या निक्षेपाने जिनेश्वरांची पूजा केली पाहिजे. || १७३ ||

भावार्थ ---- गृहस्थ हा पुण्य मिळविण्यासाठी पूजा करतो. तेव्हा ती विधिपूर्वक केली पाहिजे. प्रथम एका ताटात किंवा पात्रात स्वस्तिक चंदनाने काढून, भगवंताला आवाहन करावे. ज्या भगवंताला आवाहन करायचे, त्याचे नाव त्या मूर्तीत आरोपित करावे. उदा. भ. पार्श्वनाथ तीर्थकर ' अत्र अवतर अवतर ' यालाच नामनिक्षेप असे म्हणतात. पूजेचे द्रव्यपूजा आणि भावपूजा असे दोन प्रकार आहेत. अष्टद्रव्यांनी केली जाते ती द्रव्यपूजा आणि भावनेने केलेली ती भावपूजा होय. ही पूजा साधुलोक करतात. गृहस्थाने द्रव्यपूजा करणे इष्ट होय.

## स्थापनेचे महत्त्व

विना न्यासं न पूज्य: स्यान्न वन्द्योऽसौ दृषत्सम: |

सुखं न जनयेत् न्यासवर्जित : प्राणिनां क्वचित् || १७४ ||

अर्थ ---- स्थापना केल्याशिवाय प्रतिमा पूज्य नसते आणि वंदनीयही नसते. उलट ती पाषाणाप्रमाणें असते. स्थापनेशिवाय प्रतिमा प्राण्यांना कोणत्याही प्रकारचे सुख देऊ शकत नाही. || १७४ ||

भावार्थ ---- मूलत: कोणतीही प्रतिमा ही निर्जीव पाषाणप्रमाणे असते. आपणच स्थापना करून त्यात देवत्वाची निर्मिती करतो. देवत्वाची भावना करतो. तेव्हाच ती प्रतिमा वंदनीय आणि पूज्य ठरते. स्थापनेशिवायची पूजा म्हणजे दु:खाला कारण ठरते.

## नामनिक्षेप

अतदगुणेषु भावेषु व्यवहारप्रसिध्दये |
यत्संज्ञाकर्म तन्नाम नरेच्छावशवर्तनात् || १७५ ||

अर्थ - गुणाशिवाय पदार्थाच्या ठिकाणी व्यवहाराकरिता मनुष्य आपल्या इच्छेने जे संज्ञाकर्म करतो त्याला नामनिक्षेप असे म्हणतात || १७५ ||

भावार्थ - वस्तूच्या ठिकाणी नसलेल्या गुणांचा त्या ठिकाणी आरोप करणे / कल्पना करणे यालाच नामनिक्षेप असे म्हणतात. आवाहन किंवा स्थापना करताना त्या प्रतिमेत आपण तीर्थकराची भावना करतो. उदा. ‘ पार्श्वनाथ तीर्थंकर अत्र अवतर अवतर ’ इ. म्हणजे त्या प्रतिमेत तीर्थकर पार्श्वनाथ आहेत अशी कल्पना करून त्याचा नामनिक्षेप करतो.

## स्थापना कशास म्हणतात ?

साकारे वा निराकारे दृषदादो निवेशनम् |
सोऽयमित्यवधानेन स्थापना सा निगद्यते || १७६ ||

अर्थ -- साकार अथवा निराकार पाषाणामध्ये ‘‘ हाच तोच आहे ’’ अशी भावना करून जो उपचार केल्या जातो त्यालाच स्थापना असे म्हणतात. || १७६ ||

## द्रव्य - निक्षेप

आगामिगुणयोग्योऽर्थो द्रव्यन्यासस्य गोचर : |

तत्कालपर्ययाक्रान्तं वस्तु भावोऽभिधीयते || १७७ ||

अर्थ - आगामी काळात गुणांच्या प्राप्तीसाठी योग्य पदार्थ द्रव्य-निक्षेपाचा विषय आहे. वर्तमान काळाच्या पर्यायाने - अवस्थेने संयुक्त पदार्थ हा भावनिक्षेप होय. || १७७ ||

भावार्थ -- भविष्य काळात गुणांची ( आत्मगुणांची ) प्राप्ती व्हावी म्हणून योग्य पदार्थाचा स्वीकार हा द्रव्यनिक्षेपाचा विषय आहे. वर्तमान काळाच्या अपेक्षेने पदार्थ हा पर्याय युक्त ( म्हणजे बदल होणार ) असल्यामुळे तो भावनिक्षेप होय. म्हणजेच द्रव्यार्थिक नयाने पदार्थात बदल घडत नाही. तो तसाच आहे त्या स्थितीत असतो. पण भावार्थिक नयाने वस्तूच्या स्वरूपात वर्तमानकाळात बदल घडतो. त्याला पर्यायी अवस्था प्राप्त होते. उदा. सोने - मुळ स्वरूप - दागिने हे त्याचे पर्याय रूप.

## शक्तीप्रमाणे पूजन करावे

इति चतुर्विधत्वेन न्यासं कृत्वा सुभावत: |

श्रावकै: शुध्दसम्यक्त्वै: पूजा कार्या सशक्तित : || १७८ ||

अर्थ ---- अशा रीतीने चारही विधींनी युक्त आणि भावपूर्वक जिनेंद्रदेवाची ( न्यास ) स्थापना करून शुध्द सम्यक्त्वी श्रावकाने यथाशक्ती जिनेंद्रदेवाची पूजा करावी. || १७८ ||

## भावपूजा

जिनेश्वर गुण ग्रामरंजितैर्यतिसत्तमै : |

पूजा भावेन सत्कार्या सर्वपापापहारिणी || १७९ ||

अर्थ ---- जिनेंद्र भगवंताच्या गुणसमूहांनी अनुरंजित उत्तम साधुजनांनी सर्व पापांचा नाश करणारी भावपूजा करावी. || १७९ ||

त्रिकाल पूजा करावी

त्रिकालंक्रियतेभव्यैःपूजापुण्यविधायिनि |
या कृता पापसंघातं हन्त्याजन्मसमर्जितम् || १८० ||

अर्थ ---- पुण्यमय अशी ही जिनपूजा भव्य लोक तिन्ही काळी करतात. यथाविधि केलेली पूजा जन्म - जन्मान्तरी संचित अशा पापांचा नाश करते. || १८० ||

त्रिकाल पूजेचे फळ

पूर्वान्हे हरते पार्प, मध्यान्हे कुरूते श्रियम् |
ददाति मोक्षं संध्याप्तं, जिनपूजा निरन्तरम् || १८१ ||

अर्थ - सतत प्रभातकाळी केलेली पूजा पापहरण करते. मध्यान्ही ( दुपारी ) केलेली पूजा लक्ष्मी उत्पन्न करते. आणि सायंकाळी केलेली पूजा मोक्ष प्राप्त करून देते. || १८१ ||

भावार्थ ---- कोणत्या वेळी पूजा केली असता काय फळ मिळते याचे वर्णन ग्रंथकाराने या श्लोकात केलेले आहे. सकाळच्या वेळी पूजा केली तर पाप नाहीसे होते. मध्यान्ही म्हणजे दुपारी पूजा केली तर धनसंपत्ती ( लक्ष्मी ) प्राप्त होते. आणि सायंकाळी केलेली पूजा ही मोक्षप्राप्तीचे कारण ठरते.

## गुरूपास्ति

इत्यवं जिनपूजां  च वर्णयित्वा युगे पदे |

गुरूपास्तिं प्रवक्ष्येऽहं सर्वसौख्यस्य कारणम् || १८२ ||

अर्थ --अशा प्रकारे श्रावकाच्या दुसऱ्या पदात जिनपूजेचे वर्णन करू न आता मी सर्वसुख प्रदान करणाऱ्या गुरू पास्तीचे वर्णन करतो.  || १८२ ||

भावार्थ -- ग्रंथकार म्हणतात, आतापर्यत मी जिनपूजेचे महत्त्व सांगून ती कशाप्रकारे करावी, याचे वर्णन केले आहे.  आता मी दुसऱ्या भागाकडे म्हणजे गुरू पास्तिकडे वळतो.  गुरुचे महत्त्व, त्यांची आवश्यकता कशी आहे, हे ते सांगतात. || १८२ ||

## गुरू  पूजा का करावी ?

गुरू सेवा विधातव्या मनोवांछितसिध्दये |

संशयध्वान्तनाशार्थमिहामुत्र सुखाय च || १८३ ||

अर्थ -- श्रावकांनी मनोवांछित कार्याच्या सिध्दीसाठी आणि संशयरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी आणि परलोकात सुख मिळविण्यासाठी गुरूंची सेवा केली पाहिजे. || १८३ ||

## सर्वासाठी गुरू  सेवा

उत्तमा मध्यमा ये च जघन्या अपि मानवा : |

गुरुं विना न तेऽपि स्युगुरू : सेव्यो महानतः || १८४ ||

अर्थ ---- जगातील सर्व उत्तम, मध्यम आणि जघन्य मनुष्य गुरू शिवाय राहू शकत नाही. म्हणून श्रावकाने महान अशा गुरूं ची सेवा केलीच पाहिजे. || १८४ ||

भावार्थ ---- गुरूचे महत्त्व सांगताना ग्रंथकार म्हणतो मनुष्य कितीही श्रेष्ठ असला, मध्यम असला किंवा वाईट असला तरी त्याला जर ज्ञान प्राप्त करायचे असेल, तर गुरू शिवाय गत्यंतर नाही. म्हणून प्रत्येक श्रावकाने आपला एक गुरू निश्चित केला पाहिजे आणि त्याची मनोभावे सेवा केली पाहिजे.

अशुभ कर्मांचा नाश पूजेने

शुभाशुभमहाकर्मकलिता मनुजाः सदा |
गुरूपदिष्टाचारेण जायन्ते गुरवो गुणैः || १८५ ||

अर्थ - मनुष्य नेहमी शुभ आणि अशुभ अशी कर्मे करीत असतो. म्हणून गुरू कडून सांगितल्या गेलेल्या आचारांनी शुध्द होऊन तो ( आपल्या ) गुणांनी श्रेष्ठ बनतात. || १८५ ||

भावार्थ - मनुष्य हा नेहमी चुकत असतो. त्याच्या चुकांमुळे त्याच्या हातून शुभ-अशुभ कार्ये घडत असतात. म्हणून गुरू पासून योग्य आचारांचे मार्गदर्शन घेऊन, चुका दुरूस्त करून व आचार शुध्द करू न तो स्वतःच गुरू होतो. चुकातून शिकत शिकत तो स्वतःच गुरूचे स्थान मिळवू शकतो.

## गुरू ची महती

शिष्यानुग्रहकर्ता यो दुरितेनपावक : ।
पंचेद्रियमहाभोगविरतो विश्ववंदित: ।। १८६ ।।

प्रमादमदमुक्तात्मा जिनाज्ञाप्रतिपालक: ।
शास्त्रानां पाठने शक्त: पठने च सदा पटु: ।। १८७ ।।

धर्मोपदेशपीयूषप्रक्षालितमनोमल: ।
सम्यक्त्वरत्नालंकार: सम्यक्ज्ञानसुभोजन: ।। १८८ ।।

सम्यक्चारित्र सद्वस्त्रवेष्टितांगो विशुध्दधी: ।
महोपशममातंगसमारू ढ: शुभाशय: ।। १८९ ।।

सर्वजीवहित: सर्वजीव कल्याणकारक: ।
पापमिथ्यात्वदुष्कर्महारको भवतारक: ।। १९० ।।

मुक्तबाह्यांतरग्रंथो जैनधर्मप्रभावक: ।
गणी सर्वगणाधारो मूलमार्ग प्रदर्शक: ।। १९१ ।।

इत्यादि गुणसद्रत्नसमुद्र: गुरूराट् भवेत् ।
भव्यजीवान् भवाम्भोधौ पततोऽप्यवलंबनम् ।। १९२ ।।

अर्थ - गुरू  कसा असावा याचे या श्लोकात वर्णन केलेले आहे.

जो शिष्यावर अनुग्रह (कृपा) करणारा पापरू पी इंधनाला जाळण्यासाठी अग्निसमान असणारा, पंचेद्रियांच्या महान भोगापासून विरक्त असलेला, वि।वाला वंद्य असणारा, प्रमाद (चुका) आणि मद (गर्व ) यापासून मुक्त असणारा, जिनाज्ञेचे पालन करणारा, शास्त्र शिकविण्यात तल्लीन असलेला, स्वत: स्वाध्याय करणारा, धर्मोपदेशरूपी अमृताने लोकांच्या मनातील अशुध्दता नष्ट करणारा, सम्यक्चारित्र्यरूपी उत्तम वस्त्रांनी वेष्टिलेला, विशुध्द बुध्दी असलेला, महान उपशमभावरूपी गजराजावर आरुढ झालेला, उत्तम विचारांचा धनी, सर्व जीवांचे कल्याण करणारा, पाप, मिथ्यात्व आणि दुष्कर्म नष्ट करणारा, संसारातून तारून नेणारा, अंतर्बाह्य परिग्रहापासून मुक्त, जैन धर्माची प्रभावना करणारा, गणांचा (शिष्यांचा) स्वामी आणि जैन धर्माची मूळ मार्गाचा पथप्रदर्शक असावा. इत्यादि सर्वगुण- रत्नांचा सागर असलेला असा श्रेष्ठ गुरू या भवसमुद्रात सापडलेल्यांना आपल्या हाताचा आधार देऊ शकेल. || १८६|| ते || १९२ ||

## गुरू शिवाय मार्गदर्शन नाही

गुरूं बिना न कोऽप्यस्ति भव्यांना भवतारक: |
मोक्षमार्ग - प्रणेता च सेव्योऽत: श्रीगुरू सताम् || १९३ ||

अर्थ - गुरू शिवाय भव्य जीवांना भवसागर तारून नेण्यास कोणही समर्थ नाही आणि गुरू शिवाय दुसरा कोणी मोक्षमार्गाकडे नेणाराही नाही. म्हणून भव्य जनांनी गुरूंची सेवा करावी. || १९३ ||

भावार्थ - मनुष्याचे ध्येय हे मोक्षप्राप्तीचे असते. अंतीम ध्येय-मोक्ष मिळविण्यासाठी गुरूंची गरज असते. गुरूच त्याला मार्गदर्शन करून संसाररूपी सागर पार करण्याचा मार्ग दाखवितो.

## गुरू विषयी विनयभाव

गुरुणां गुणयुक्तानां विधेयो विनयो महान् |
मनोवचनकायैश्च कृतकारितसम्मतैः || १९४ ||

अर्थ - गुणांनी युक्त अशा गुरूंचा मन, वचन, कायेने आणि कृत-कारित-अनुमोदनाने विनय करावा.

भावार्थ - गुरू हे गुणांनी श्रेष्ठ आहेत, गुणसंपन्न आहेत. तेव्हा अशा गुरूशी नम्रभावनेने वागले पाहिजे. तन-मन-वाणीने त्यांचे आज्ञापालन केले पाहिजे. त्यांच्या आज्ञेचे पालन करणे, त्यांच्या कामाला अनुमोदन देणे अशा प्रकारे गुरू विषयी नेहमी विनय / नम्रभाव ठेवावा.

विनयो विदुषा कार्यश्चतुर्धा धर्मसध्दिया |
विनयेन गुरोश्चित्तं रंजतेऽर्निशं ननु || १९५ ||

अर्थ -- धर्मामध्ये सद्बुध्दी ठेवणाऱ्यांनी दर्शन, ज्ञान, चारित्र आणि उपचार अशा चार प्रकारे गुरुंचा विनय करावा. विनयामुळे गुरूचे मन रात्रंदिवस प्रसन्न राहते. || १९५ ||

भावार्थ -- धर्मामध्ये सद्बुध्दी म्हणजे श्रध्दा ठेवणाऱ्या लोकांनी गुरूंची चार प्रकारे सेवा करावी. दर्शन, ज्ञान, चारित्र आणि उपचार पाळून विनम्रता दाखवावी. नम्र वागणुकीने गुरू प्रसन्न होतो. रात्रंदिवस त्यांचे मन प्रफुल्लित राहते. गुरुंच्या दोषाकडे न पाहता, त्यांची निंदा न

करता, त्यांच्या तप: साधनेकडे, निर्मोही व्रतपालनाकडे, नग्नत्वाचे दृढतेने पालन करण्याकडे पाहून त्यांना वंदन, त्यांची पूजा, सत्कार करावा.

आज काही अध्यात्ममार्गी लोक जैन निर्ग्रंथ साधूंची सतत निंदा करतात, निंदा ऐकून हर्षित होतात. हे त्यांचे करणे / वागणे हा गुरू - द्रोह होय. ते महान पाप - कर्म आहे. मुनींच्या आचरणात जे दोष आहेत, ते त्यांच्या तीव्र मोहनीय कर्मांच्या उदयाने होतात. तेव्हाढ्यामुळे त्यांचे सम्यक्दर्शन नष्ट होत नाही, वा साधूपणाही नष्ट होत नाही. त्या मुनींना उत्कृष्ट तपात, ध्यानात व आचरणात स्थिर ठेवण्याचे कार्य त्यांच्या आचार्यांचे आहे. श्रावकांना की ज्यांनी श्रावकधर्मही स्वीकारला नाही, त्यांना गुरुंच्या दोषाबद्दल दोष देण्याचा अधिकार नाही. श्रावकांनी प्रथम आपल्या दोषाकडे पाहून आत्म्याला सुस्थित करावे.

## गुरुसेवेचे फळ

सुरा: सेवा प्रकुर्वन्ति दासत्वं रिपवोऽखिला: |

सिंध्यन्ति विविधा विद्या विनयादेवधीमताम् || १९६ ||

अर्थ -विनयामुळे देव देखील श्रावकांची सेवा करतात, शत्रू दास्यत्व स्वीकारतात. विनयामुळे बुध्दिमान मनुष्य अनेक विद्या प्राप्त करून घेतो.

भावार्थ - विनय हा दुसऱ्याला वश करणारा मोठा गुण आहे. नम्रतेमुळे देवदेखील तुम्हाला वश होऊन तुमची सेवा करतील. शत्रु तुमचे दास्यत्व स्वीकारतील आणि विनयामुळे गुरू कडून सर्व विद्या ग्रहण करता येतात. विनयाशिवाय विद्येची प्राप्ती होत नाही. आपल्या जीवनाला मार्गदर्शन गुरूच करू शकतो. म्हणून गुरूंची सेवा करून जीवन मंगल, पवित्र बनवावे.

## सुख प्राप्तीचा उपाय

गुरू पास्तिमथोऽप्युक्त्वा वक्ष्ये स्वाध्यायसंयमौ |

तपौ दानं च भव्यांना सुखसिध्दयर्थमीप्सितम् || १९७ ||

अर्थ -- अशा प्रकारे गुरूपास्तीचे वर्णन करून मी भव्यजनांच्या इच्छित सुखाच्या प्राप्तीसाठी स्वाध्याय, संयम, तप आणि दानाचे वर्णन करीत आहे.

भावार्थ -- ग्रंथकारांनी आतापर्यत गुरू कसा असावा, त्यांचे महत्त्व, त्यांच्याशी वागण्याची विनयपूर्वक रीत या द्वारे ‘ गुरू पास्ति ’ हे प्रकरण संपविले आहे. आता ग्रंथकार स्वाध्याय, संयम, तप आणि दान या संबंधीची माहिती देऊन या भव्य जीवाला सुख कसे प्राप्त होईल याची माहिती सांगणार आहेत.

## स्वाध्यायाची महती

स्वाध्याय पंचधा प्रोक्तो लोकानां ज्ञानदायक: |
वाचना पृच्छनाऽम्नायोऽनुप्रेक्षा धर्मदेशना || १९८ ||

अर्थ -- लोकांना ज्ञान देणारा स्वाध्याय पाच प्रकारचा सांगितला आहे. वाचना, पृच्छना, आम्नाय, अनुप्रेक्षा आणि धर्मोपदेश हे ते पाच प्रकार आहेत. || १९८ ||

भावार्थ -- स्वाध्याय म्हणजे जीवनाला प्रबोधन करणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या, आत्मिक समाधान देणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथाचे वाचन / मनन व चिंतन. जैन आगम संस्कृत प्राकृत भाषेमध्ये असल्यामुळे अनेकदा काही भाग कळत नाही. म्हणून आपल्याहून जे ज्ञानी असतील त्यांच्याकडून शंकांचे निरसन करून घ्यावे, हा पृच्छना नावाचा स्वाध्यायच होय. त्या सर्वांचे वर्णन पुढील श्लोकातून केले आहे.